जनतेचा

# सावधान महाराष्ट्र

निर्भीड आणि निष्पक्ष

Postal No - NMB/194/2025-27
Posted AT- koparkhairane Navi mumbai, Weekly Thursday

मुख्य संपादक : राजेंद्र बोडके : ९३२२५९२८१४

◆वर्ष : ५ ◆अंक : ५२ ◆नवी मुंबई / ठाणे / महाराष्ट्र ◆मंगळवार दि. ९ डिसेंबर २०२५ ते १५ डिसेंबर २०२५ ◆मराठी साप्ताहिक ◆पाने : ४ ◆किंमत : २ /- ◆RNI- MAHMAR/2020/79438

जनतेचा सावधान महाराष्ट्र या वृत्तपत्रासाठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण विभागासाठी पत्रकार व जाहिरातदार नेमणे आहे, अनुभवी व इच्छुकांनी खालील नंबरवर संपर्क साधावा.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिनी नमुंमपा मुख्यालयात अभिवादन




भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिना निमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री.किसनराव पलांडे, अति. शहर अभियंता श्री.अरविंद शिंदे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, मालमत्ताकर विभागाचे उपआयुक्त डॉ.अमोल पालवे, कार्यकारी अभियंता श्री.राजेश पवार, मुख्य स्वच्छता अधिकारी श्री.राजेंद्र इंगळे आणि इतर अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बिबट्या हल्ल्यातील पीडित कुटुंबांना नवी आशा; वनमंत्री गणेश नाईक यांचा रोजगार हमीचा निर्णय



**प्रतिनिधी : जनतेचा सावधान महाराष्ट्र :** नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी वनमंत्री गणेश नाईक यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधत राज्य सरकारचा एक संवेदनशील आणि जनहिताचा निर्णय जाहीर केला. अलीकडील बिबट्या हल्ल्यांमध्ये ज्यांनी प्राण गमावले, त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेताना त्यांनी अत्यंत वेदनादायी वास्तव मांडले - घरातील प्रमुख व्यक्ती गेल्याने संपूर्ण कुटुंब उद्धवस्त झालेली आहेत आणि त्यांचे भविष्य अंधारात गेले आहे.

ही गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन वनमंत्री गणेश नाईक यांनी स्पष्ट केले की, ज्यांचा बळी गेला त्या प्रत्येक कुटुंबातील १८ वर्षे पूर्ण केलेल्या पात्र वारसाला वनविभागात नोकरी देण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवण्यात येणार आहे. प्रारंभी तात्पुरती नोकरी आणि शासन नियमांनुसार पुढे कायमस्वरूपी नियुक्ती अशी संरचना या प्रस्तावात समाविष्ट आहे.

या निर्णयामुळे दुर्दैवी कुटुंबांना आर्थिक स्थैर्य, मानसिक आधार आणि भविष्यासाठी सुरक्षितता मिळणार असून, कठीण परिस्थितीत सरकार त्यांच्या पाठीशी उभे असल्याचा विश्वास जनतेत दृढ होणार आहे. वनमंत्री गणेश नाईक यांच्या पुढाकारामुळे ही घोषणा अधिक प्रभावी ठरली असून, हा निर्णय मानवतावादी दृष्टिकोनाचा उत्तम नमुना असल्याचे मानले जात आहे.

## इंडिगोची हवाई सेवा ठप्प; मुंबईत १०४ उड्डाणे रद्द, हजारो प्रवाशांचे हाल - केंद्र सरकारची मोठी कारवाईची तयारी




**प्रतिनिधी: जनतेचा सावधान महाराष्ट्र :** देशातील सर्वात मोठी विमान कंपनी असलेल्या इंडिगो एअरलाईन्सची हवाई सेवा गेल्या सहा दिवसांपासून गोंधळात सापडली आहे. मुंबई, दिल्ली, बंगळुरू या प्रमुख विमानतळांवर उड्डाणे रद्द होण्याची मालिका सुरूच आहे. सकाळपासून तिकीट काऊंटरवर प्रवाशांच्या लांब रांगा लागल्या असून प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.

मुंबईत तब्बल १०४ उड्डाणे रद्द, तर दिल्लीमध्ये मध्यरात्रीपर्यंतची संपूर्ण उड्डाणे स्थगित करण्यात आली आहेत. बंगळुरू विमानतळावर १०० हून अधिक उड्डाणांवर परिणाम झाला आहे. या गोंधळाचा थेट परिणाम कंपनीच्या शेअर बाजारातील **(उर्वरित वृत्त पान २ वर)**

## मस्क्युलर डिस्ट्रॉफी रुग्णांसाठी मोठा दिलासा; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केली १०० इलेक्ट्रिक व्हीलचेअरची तात्काळ मदत




**ठाणे : प्रतिनिधी जनतेचा सावधान महाराष्ट्र:** मस्क्युलर डिस्ट्रॉफीग्रस्त मुलांच्या उपचार आणि सुविधांसाठी राज्य सरकार सर्वतोपरी मदत करणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ठाण्यात दिली. शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आणि श्रीकांत शिंदे फाउंडेशन यांच्या सहकार्याने आयोजित इलेक्ट्रिक व्हीलचेअर आणि 'बॅटमेड बायपॅप' मशीन वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमात मस्क्युलर डिस्ट्रॉफीग्रस्त मुलांना आणि गरजू रुग्णांना अत्यावश्यक वैद्यकीय साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी तत्काळ १०० अतिरिक्त इलेक्ट्रिक व्हीलचेअर देण्याची महत्वपूर्ण घोषणा केली. तसेच ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर आणि पोर्टेबल वेंटिलेशन उपकरणे उपलब्ध करून देण्याची तयारीही व्यक्त केली.

शिंदे म्हणाले की, **(उर्वरित वृत्त पान २ वर)**

## सिडकोतर्फे देशातील पहिला आयकॉनिक मल्टिपर्पज इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेना नवी मुंबईमध्ये उभारण्याच्या प्रक्रियेला सुरुवात



"नवी मुंबईला जागतिक दर्जाचे करमणूक केंद्र व उत्कृष्ट शहर म्हणून प्रस्थापित करण्याचा सिडकोला सार्थ अभिमान आहे. देशातील पहिला आयकॉनिक मल्टिपर्पज इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेना उभारणीसाठी सुरू करण्यात आलेली प्रक्रिया ही आगामी सांस्कृतिक आणि आर्थिक क्रांतीचा पाया आहे. या प्रकल्पाद्वारे जागतिक दर्जाची करमणूक भारतीयांकरिता खुली होऊन कलाकार, उद्योजक आणि स्थानिक समूहांकरिता व्यापक प्रमाणावर संधी उपलब्ध होणार आहेत व नवी मुंबईचे जागतिक नकाशावरील स्थान अधिक बळकट होणार आहे. प्रत्येक टप्प्यावर कल्पनांना मूर्त रूप देण्यासाठी असलेली सिडकोची कटिबद्धता अधोरेखित होत आहे.''

**श्री. विजय सिंघल,**
उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

दूरदर्शी नियोजनाद्वारे व विशिष्ट उद्देशाने विकसित करण्यात आलेले नवी मुंबई हे देशाच्या नगर नियोजनाला नवीन दिशा देणारे शहर ठरले आहे. भविष्यातील शहर म्हणून संकल्पित असलेली नवी मुंबई वर्तमानातील शहर म्हणून दिमाखाने झळकत आहे. हे परिवर्तन घडवून आणण्यासह देशातील थेट करमणूक क्रांती (live entertainment revolution) चा केंद्रबिंदू म्हणून नवी मुंबईला नावारूपाला आणत असल्याचा सिडकोला सार्थ अभिमान आहे.

या संदर्भातील एक महत्त्वाचे पाऊल म्हणून देशातील पहिला आयकॉनिक मल्टिपर्पज इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेना नवी मुंबईमध्ये उभारण्यासाठी सिडकोतर्फे स्वारस्य अभिव्यक्ती जारी करून प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. स्वारस्य अभिव्यक्ती दस्तऐवज दि. ९ डिसेंबर २०२५ पासून ऑनलाइन उपलब्ध असणार असून निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत (भारतीय प्रमाण वेळ) आहे.

न्यूयॉर्क येथील मॅडिसन स्क्वेअर गार्डन आणि लंडन येथील ओटू अरेना या बहुउद्देशीय नाट्यगृहांपासून प्रेरणा घेऊन विकसित करण्यात येणारा हा प्रकल्प देशातील करमणूक पायाभूत सुविधांमध्ये नवीन मानदंड प्रस्थापित करणार आहे. रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या संगीतसभा, आंतरराष्ट्रीय क्रीडाविषयक कार्यक्रम, भव्य स्तरावरील सांस्कृतिक महोत्सव आणि आभासी अनुभव (immersive productions) **(उर्वरित वृत्त पान २ वर)**

## समाजसेवक राजेंद्र होवाळे यांना नगरसेवक म्हणून पाहण्याची कोपरखैरणे नागरिकांची जोरदार मागणी




**प्रतिनिधी : जनतेचा सावधान महाराष्ट्र :** कोपरखैरणे विभागात गेली २० ते २२ वर्षे अविरत समाजकार्य करत आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे राजेंद्र गंगाराम होवाळे हे आज प्रभाग क्रमांक ११ मधील सर्वात लोकाभिमुख आणि विश्वासू समाजसेवक म्हणून उदयास आले आहेत. सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील छोट्याशा होळीचागाव या गावातून साध्या - गरीब कुटुंबात जन्मलेले होवाळे यांनी आपल्या कष्टातून, प्रामाणिकपणातून आणि लोकसेवेच्या अढळ ध्यासातून कोपरखैरणे विभागातील हजारो नागरिकांच्या मनात एक स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे.

ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी, तरुण - तरुणी, कामगार आणि विविध समाजघटकांच्या समस्यांसाठी वेळेला धावून येणारा हात म्हणजे राजेंद्र होवाळे. वनमंत्री व पालकमंत्री पालघर गणेश नाईक, माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक तसेच माजी महापौर सागर नाईक आणि युवा नेतृत्व वैभव नाईक यांच्या मार्गदर्शना खाली अनेक वर्षे त्यांनी कोपरखैरणे विभागात सामाजिक परिवर्तनाचे कार्य अखंडपणे सुरू ठेवले आहे.







होवाळे यांनी महिला सक्षमीकरणासाठी घेतलेली पुढाकार विशेष उल्लेखनीय आहे. सेक्टर २, ३ मधील महिलांना लिज्जत पापड प्रशिक्षण, पापड आणि चपाती उद्योगात सहभाग, महिला दिनाचे भव्य आयोजन, महिलांवरील अत्याचार आणि उपाय यावरील चर्चासत्र - या सर्व उपक्रमांतून त्यांनी हजारो महिलांना उभारी दिली.

विद्यार्थी हितासाठी दरवर्षी निबंध स्पर्धा, दहावी - बारावी नंतरचे मार्गदर्शन, एमपीएससी - यूपीएससीसाठी करिअर सल्ला अशा उपक्रमांतून अनेक विद्यार्थी उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करू लागले. अनेक वेळा विद्यार्थी आणि पालक त्यांच्या घरी जाऊन सल्ला घेतात, हीच त्यांची समाजातील प्रतिमा दर्शवणारी खरी संपत्ती आहे.







धार्मिक, सांस्कृतिक आणि कला - संस्कृती क्षेत्रातही होवाळे यांची सतत उपस्थिती आणि योगदान उल्लेखण्यासारखे आहे. बाबासाहेब आंबेडकर जयंती, अखंड हरिनाम सप्ताह, नवरात्रोत्सव, गणेशोत्सव, हनुमान जयंती अशा विविध कार्यक्रमांत त्यांचा सहभाग कार्यक्रमांना अधिक अर्थपूर्ण करतो.

सामाजिक मदतीतही ते नेहमीच पुढे राहिले आहेत. गणेश नाईक यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, आजारी नागरिकांना आर्थिक सहाय्य, मोफत आरोग्य शिबिरे, औषधोपचार सुविधा, रक्तदान शिबिरात ३७ बाटल्या रक्तसंकलन - हे त्यांच्या जनसेवेचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

बँक मॅनेजर म्हणून जी पी पारसिक बँकेत कार्यरत असूनही, मिळालेल्या उत्पन्नातून समाजकार्यासाठी निधी बाजूला ठेवणारे होवाळे हे दुर्मिळ पण आवश्यक असे जननेतृत्व आहे. त्यांच्या डिक्शनरीत 'नाही' हा शब्दच नाही - नागरिकांनी मांडलेल्या प्रत्येक समस्येसाठी ते स्वतः धावपळ करून ती सोडवतात.

आज प्रभाग क्रमांक ११ मध्ये राजेंद्र होवाळे यांच्या नावे प्रचंड जनसमर्थन उमटताना दिसत आहे. 'आपल्या घराचा माणूस, आपल्या हक्काचा माणूस' अशी ओळख असलेले होवाळे नगरसेवक झाले तर प्रभागाचा सर्वांगीण विकास निश्चित आहे, अशी ठाम लोकभावना निर्माण झाली आहे.

गणेश सेवा मंडळ, पार्वतीबाई गंगाराम होवाळे चॅरिटेबल ट्रस्ट, साईकिरण सोसायटी, आणि विविध संस्थांच्या माध्यमातून कार्यरत असलेले होवाळे हे प्रामाणिक, सुशिक्षित, संवेदनशील आणि जनतेसाठी पूर्णवेळ उपलब्ध राहणारे नेतृत्व आहे.

नवी मुंबई महानगरपालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ११ मधून राजेंद्र होवाळे यांना उमेदवारी मिळावी आणि ते लोकप्रतिनिधी होऊन जनसेवा आणखी व्यापक प्रमाणात करावी, अशी नागरिकांची प्रबळ इच्छा आज स्पष्टपणे व्यक्त होत आहे.

जनतेचा सावधान महाराष्ट्र
निर्भीड आणि निष्पक्ष

## संपादकीय

# झोपडपट्टी मुक्तीसाठी समूह पुनर्विकासाचा पर्याय

मुंबईला झोपडपट्टीमुक्त करण्याच्या उद्दिष्टासाठी सरकारने पारंपरिक पुनर्वसन योजनांच्या मर्यादा ओळखल्या आहेत. त्यामुळे आता या प्रक्रियेला गती देण्यासाठी समूह पुनर्विकासाचा पर्याय पुढे आणला आहे.

मुंबईला झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) स्थापन झाले. प्राधिकरणाच्या स्थापनेपासून आजवर सुमारे ३० वर्षांत मुंबईतील काही झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास झाला आहे, तर आजही अनेक योजना पुनर्विकासाच्या प्रतीक्षेत आहेत. एसआरए योजना राबविण्यासाठी विकासकांनी झोपड्या पाडून नागरिकांच्या वास्तव्यासाठी पर्यायी संक्रमण शिबिरे उभारली आहेत. एसआरए योजना रखडल्याने विकासकांनी बांधलेली संक्रमण शिबिरे मोडकळीस आली असून त्यामध्ये अनेक कुटुंबे जीव मुठीत घेऊन राहत आहेत. रहिवाशी विकासक आणि एसआरएकडे तक्रारी करत असले, तरी गोरगरीब जनतेला कुणीही वाली नसल्याने त्यांच्या समस्या सुटलेल्या नाहीत.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत मोठ्या प्रमाणात नफा असल्याने यामध्ये कोणताही अनुभव नसलेले लोक विकासक झाले. कोणतीही आर्थिक क्षमता नसतानाही अनेक भागांतील प्रकल्प या विकासकांनी राबविण्यास सुरू केले. पण प्रत्यक्षात ते पूर्ण होऊ न शकल्याने ते अपूर्ण अवस्थेत सोडून विकासकांनी पळ काढल्याची अनेक उदाहरणे मुंबईत देता येतील. एसआरएचे नामांकित विकासकांचे अनेक घोटाळे समोर आल्याने विकासकांना तुरुंगाची हवा खावी लागली आहे.

एसआरए प्रकल्पात राजकीय नेते, विकासक आणि एसआरए अधिकारी यांच्या अभद्र युतीमुळे अनेक झोपडपट्ट्यांचे प्रकल्प रखडले आहेत. विकासकांकडून फसवणूक झाल्यानंतर झोपडीधारक एसआरए अधिकाऱ्यांना वेठीस धरतात. अशा अनेक गुंतागुंतीमध्ये मुंबईतील अनेक झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास रखडला आहे. यापूर्वी राबविण्यात आलेल्या एसआरए इमारतींच्या कामाच्या दर्जाबरोबरच अनेक नियम धाब्यावर बसविण्यात आल्याने आज एसआरए योजना म्हणजे उभ्या झोपडपट्टी झाल्या आहेत. पाणी, पार्किंग, कचरा, दुर्गंधी अशा अनेक समस्यांनी या इमारतींना ग्रासले आहे.

एसआरए योजना राबविणारे विकासक यापूर्वी झोपडीधारकांना पर्यायी वास्तव्यासाठी दरमहा भाडे देत. मात्र अनेक विकासक झोपडीधारकांना वर्षानुवर्षे भाडे देत नसत. त्यामुळे आता विकासकांना प्रकल्पाचे काम सुरू करण्यापूर्वीच दोन वर्षांचे आगाऊ भाडे एसआरएकडे जमा करावे लागत आहे. यामुळे विकासकांची आर्थिक गणिते बिघडली असून, त्याचा परिणाम मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकासाच्या योजनांवर झाला आहे. याला आता कोरोना साथीचे निमित्त झाले आहे. कोरोना साथीनंतर अनेक विकासकांनी आर्थिक परिस्थिती बिकट झाल्याने रखडलेल्या एसआरए योजना राबविण्यासाठी अभय योजना, संयुक्त उपक्रम आणि निविदा पद्धतीने विकासकांची नेमणूक अशा योजना सध्या राबविण्यात येत आहेत.

रखडलेल्या योजनांना गती देण्यासाठी गृहनिर्माण विभागाने समूह झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार एसआरए ५० एकर सलग क्षेत्रफळ असलेल्या जमिनीचे समूह निर्धारित करेल. यामध्ये ५१ टक्क्यांपेक्षा अधिक झोपडपट्टी क्षेत्राचा समावेश करण्याची सूचना केली आहे. तसेच यामध्ये जीर्ण झालेल्या इमारती, अरुंद रस्त्यांमुळे धोकादायक असलेल्या इमारती, सेस इमारती, भाडेकरू इमारती, शासकीय इमारती किंवा निमशासकीय इमारती यांचा समूह झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत समावेश करता येणार आहे. समूह पुनर्विकासाच्या प्रस्तावावर उच्चस्तरीय समिती अंतिम निर्णय घेणार आहे.

एसआरए योजना राबविण्यासाठी यापूर्वी झोपडीधारकांची संमती घेण्यात येत होती. मात्र हळूहळू झोपडीधारकांच्या संमतीची टक्केवारी कमी होत गेली आहे. आता तर समूह पुनर्वसन योजनेत झोपडीधारकांच्या संमतीची अटच काढून टाकण्यात आली आहे, तर समूह पुनर्विकास योजनेचा भाग असलेली शासकीय, निमशासकीय जमीन भाडेपट्टा अथवा भोगवटा तत्त्वावर देण्यात आली असल्यास अशा जमिनीचाही या योजनेत समावेश करण्यात येणार आहे. त्यासाठी संबंधित व्यक्तीचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. समूह पुनर्विकासात झोपडी तोडण्यापूर्वी दोन वर्षांपूर्वीचे भाडे तसेच तिसऱ्या वर्षीच्या भाड्याचा पोस्ट डेटेड चेक एसआरएकडे जमा करावा लागणार आहे.

समूह पुनर्विकास योजनेंतर्गत प्रत्येक इमारतीसाठी संबंधित इमारतीच्या पुनर्वसन बांधीव क्षेत्रफळाच्या २ टक्के किंवा २०० चौरस मीटर यापेक्षा जे कमी असेल त्या प्रमाणात समाजमंदिर उभारून द्यावे लागणार आहे. त्याचप्रमाणे विकासकाला एकूण झोपडपट्टी क्षेत्राच्या १२ टक्के जागा मनोरंजन मैदानासाठी ठेवावी लागणार आहे. तसेच विकासकाने प्रकल्प वेळेत पूर्ण न केल्यास संबंधित विकासकावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

झोपडपट्टीमुक्त मुंबईसाठी आणखी एक नवीन योजना असून संभ्रम वाढविण्याऐवजी गृहनिर्माण विभागाने रखडलेल्या योजना कशा पूर्ण होतील, यासाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेणे गरजेचे आहे. रखडलेले प्रकल्प संबंधित प्राधिकारणांकडे वर्ग करण्यात आले. मात्र या प्रकल्पांच्या कामात अद्याप म्हणावी तशी प्रगती झालेली नाही. केवळ कुणाच्या तरी फायद्यासाठी सुरू असलेल्या प्रकल्पांमध्ये गुंता निर्माण करण्याचा हा सरकारचा प्रयत्न दिसत आहे. मुंबईतील अनेक झोपडपट्ट्यांचे प्रकल्प अपूर्ण अवस्थेत आहेत. यातच काही ठिकाणी नव्याने झोपड्या उभ्या राहत आहेत, याकडेही एसआरएने गांभीर्याने पाहिले पाहिजे.

# अखेरच्या दिवशी हजारो हरकती !

## पनवेल महापालिका मतदार यादीवर २८,९३५ जणांचा आक्षेप

**पनवेल :** आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगर पालिकेच्या प्रारूप मतदार यादीत मोठा गोंधळ उघड झाला आहे. २८,९३५ हरकती मतदारांकडून नोंदविण्यात आल्या असून, त्यापैकी अखेरच्या एका दिवसात तब्बल १८ हजार हरकतींची नोंद झाली आहे. दुबार नावे, चुकीचे प्रभाग, मृत मतदारांची नावे तसेच नामसाधर्म्यामुळे वाढलेल्या गोंधळाने निवडणूक विभागासमोर मोठे आव्हान निर्माण केले आहे.



पनवेल महापालिका निवडणुकीसाठी ५,५४,७८ मतदारांची प्रारूप यादी २० नोव्हेंबर रोजी जाहीर करण्यात आली. सुरुवातीला प्रतिसाद कमी असला तरी विविध राजकीय पक्षांनी विशेषत: शेकाप, मनसे आणि काँग्रेस या पक्षांनी समाजमाध्यमांवर या मतदार यादीतील त्रुटींची उघडपणे नोंद घेतल्यांनतर परिस्थिती बदलली. शेकापने तर पनवेलच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचेही नाव दुबार असल्याचा मुद्दा समोर आणला.

एकीकडे नवनवीन खुलासे होत असताना हरकत नोंदविण्याची मुदत २७ नोव्हेंबरवरून ३ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली. २ डिसेंबरपर्यंत केवळ १०,४०० हरकतींची नोंद झाली होती. मात्र मुदत संपण्याच्या २४ तासांत हरकतींमध्ये अचानक मोठी उसळी दिसली आणि हरकतींची संख्या जवळपास २८,९३५ वर पोहोचली.

विशेष म्हणजे यातील अनेक हरकती एकाच मतदारासाठी दुबार दाखल झाल्याची शक्यता निवडणूक विभागाने व्यक्त केली आहे.

# रायगडमध्ये महायुतीमधील वाद विकोपाला

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यात नगरपालिका निवडणूकीच्या निमित्ताने महायुतीमधील मतभेद विकोपाला गेल्याचे दिसून आले. प्रचारातील नेत्यांच्या वाकयुध्दानंतर मतदानादरम्यान कार्यकर्ते थेट हाणामारी पर्यंत येऊन पोहोचले. राज्यातील सत्ताधारी पक्षांच्या या वागणुकीमुळे जिल्ह्यतील राजकारण अजून कुठल्या थराला जाणार असा प्रश्न रायगडकरांना पडला आहे.



एका म्यानात दोन तलवारी बसू शकत नाही आणि त्या जबरदस्ती एकाच म्यानात ठेवण्याचा प्रयत्न केलाच तर त्याचा म्यान आणि तल वार दोन्हींच्या अस्तित्वावर परिणाम होण्याचा धोका असतो, रायगडच्या राजकारणात सध्या याचिच प्रचिती येत आहे. शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट हे दोन भिन्न विचारसरणीचे पक्ष एकत्र आल्यामुळे महायुतीत पराकोटीचा विसंवाद आणि मतभेद निर्माण झाल्याचे चिन्ह आहे. या मतभेदांमुळे महायुतीच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाल्याचे चित्र सध्या पहायला मिळत आहे. जिल्ह्यात पाल कमंत्री पदावरून सुरू झालेला वाद क्षमण्याऐवजी दिवसेदिवस उग्ररूप धारण करत असल्याचे चित्र आहे. रायगड जिल्ह्यात अलिबाग, मुरुड, रोहा, पेण, श्रीवर्धन, महाड, उरण, कर्जत, खोपोली आणि माथेरान नगरपरिषदांच्या निवडणूका नुकत्याच पार पडल्या, २ डिंसेबरला या नगरपालि कांसाठी मतदान प्रक्रीया पार पडली. महाड येथे नवेनगर परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गट यांच्यातील कार्यकत्यांमध्ये तुंबळ हाणामारी झाल्याचे पहायला मिळाले. गाड्या फोडणे बंदूक रोखणे यासारखे प्रकारही झाले. त्यामुळे येथील निवडणूक प्रक्रीयेला गालबोट लागले. रोहा नगरपालिकेसाठी झालेल्या मतदानादरम्यान, मेहंदळे हायस्कूल परिसरात, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि भाजपचे कार्यकर्ते एकमेकांविरोधात आक्रमक झाल्याचे पहायला मिळाले. एकमेकांच्या कार्यकर्त्यांना मारहाण करण्यापर्यंत मजल गेली, पोलीसांनी हस्तक्षेपकरून परिस्थिती नियंत्रणात आणली. पण सत्ताधारी पक्षातील वाद विकोपाला जाण्यास अनेक घटक कारणीभूत ठरले. महायुतीमधील घटक पक्षांमधील सत्ता संघर्ष हे त्यामागचे मुळ कारण आहे. जिल्ह्याच्या राजकारणावर वर्चस्व राखण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे आग्रही आहेत. शिवसेना शिंदे गटाचे भरत गोगावले यांचा त्याला विरोध आहे. त्यामुळे दोन्ही पक्षात सत्तासंघर्ष पेटला आहे.

नगरपालिका निवडणूकीत शिवसेना शिंदे गटाची कोंडी व्हावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने प्रयत्न केले. शिवसेनेचे प्राबल्य असलेल्या मतदार संघात आधी इतर पक्षातील कार्यकर्ते फोडून राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्या पक्षाची बांधणी केली. नंतर निवडणूकीच्या आधी शिवसेना शिंदे गटातील कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांना पक्षात घेण्यास सुरुवात केली. शिवसेना शिंदे गटाला एकाकी पाडून काही ठिकाणी भाजप, काही ठिकाणी शेकाप तर काही ठिकाणी शिवसेना ठाकरे गटाला सोबत घेतले. त्यामुळे शिवसेना शिंदे गट अधिकच दुखावला गेला.

गोगावले यांनी राष्ट्रघ्वादी काँग्रेस अजित पवार गटाचे वर्चस्व असलेल्या म्हसळा नगरपंचायतीला सुरुंग लावला, नगराध्यक्षासह सात नगरसेवक फोडून राष्ट्रवादी काँग्रेसची नगरपंचायतीवरील सत्ता उलधावून टाकली. खोपोली, मुरुड जंजिरा, महाड आणि रोहा नगरपालिकांच्या निवडणूक प्रचारात स्थानिक मुद्दे बाजूला ठेऊन शिवसेना शिंदे गटाच्या तिन्ही आमदरांनी खासदार सुनील तटकरे यांना लक्ष केले, त्यामुळे दोन्ही पक्षातील संबध ताणले गेले. एकमेकांवरील टिकाटिपण्यामुळे राजकीय वातावरण तापण्यास मदत होत गेली.

विकास गोगावले यांचा निकटवर्तीय सहकारी असलेल्या सुषांत जांबरे याला खासदार सुनील तटकरे यांनी निवडणूकीच्या काही दिवसांपूर्वी फोडले, त्याला पक्षात घेऊन युवकचा राज्य उपाध्यक्ष पद दिले. बामुळे गोगावले समर्थक अधिकच अस्वस्थ झाले होते. यातूनच मतदान प्रक्रीये दरम्यान दोन्ही पक्षात हाणामारी आणि वाहनांची मोडतोड झाली. मुरुड, पेण आणि महाड येथे भाजपशी युतीकरून राष्ट्रवादी काँग्रेसने आपली बाजू भक्कम करून घेतली. मात्र त्याच वेळी रोहा, श्रीवर्धन या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्राबल्य असलेल्या नगरपालिकामध्ये भाजपला सोबत घेणे टाळले. रोह्यातील भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते नाराज होते. महेंदळे हायस्कूल जवळ भाजपच्या उमेदवाराला राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकत्यांकडून मारहाण झाल्याने दोन्ही पक्षातील वाद विकोपाला गेल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे महायुतीत सत्तासंघर्ष आणि वर्चस्ववाद उफाळून आल्याचे चिन्ह सध्या रायगडच्या राजकीय पटलावर पहायला मिळत आहे.

## सिडकोतर्फे देशातील पहिला आयकॉनिक मल्टिपर्पज इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेना नवी मुंबईमध्ये उभारण्याच्या प्रक्रियेला सुरुवात

**१ वरुन** यांच्या आयोजनाकरिता २०,००० प्रेक्षकांसाठी आसन व्यवस्था आणि २५,००० उभे प्रेक्षक इतकी क्षमता या ठिकाणी असणार आहे. यामुळे हा देशातील पहिला जागतिक दर्जाचा व भव्य क्षमता असणारा इनडोअर अरेना असणार आहे.

नवी मुंबईतील पायाभूत सुविधांचा विकास अत्यंत वेगाने होत असल्याने जागतिक पातळीवरील करमणूक कार्यक्रमांचे यजमानपद भूषवण्यासाठी नवी मुंबई सक्षम झाली आहे :

- अटल सेतू ट्रान्स–हार्बर लिंक, हाय स्पीड रेल्वे मार्ग आणि नवी मुंबई मेट्रो यांद्वारे अखंड आणि वेगवान कनेक्टिव्हिटी सुनिश्चित झाली आहे.
- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाद्वारे करमणूक व्यवस्थापन (लॉजिस्टिक्स), आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलाकारांकरिता परिवहन आणि प्रसार माध्यम उत्पादन क्षमता यांमध्ये क्रांतिकारी परिवर्तन घडून येणार आहे.
- नेरूळ जेट्टीद्वारे पर्यटन, जलवाहतूक आणि चित्रपट निर्मितीच्या संधींमध्ये वाढ होणार आहे.
- फिफा मानकांचे अनुपालन करणाऱ्या चार खेळपट्ट्या आणि ४,००० आसन क्षमतेचे स्टेडियम असणारे खारघर येथील सेंटर ऑफ एक्सलन्स आणि १८ होल्सचे खारघर व्हॅली गोल्फ कोर्स यांनी नवी मुंबईचे क्रीडा व करमणूक क्षेत्रातील स्थान अधिक बळकट केले आहे.
- आगामी मेडि सिटी, एज्यु सिटी आणि एरो सिटी प्रकल्पांद्वारे नवी मुंबईचे एकात्मीक नगर विकास प्रारूप अधिक उठावदार होणार आहे.


उद्योग क्षेत्रातील प्रतिष्ठित हितसंबधींसोबत भागीदारी करून जागतिक दर्जाचे ज्ञान व परिचालन क्षमता आणून देशातील करमणूक क्षेत्राच्या भविष्याला आकार देण्याचा सिडकोचा प्रयत्न आहे.

हा उपक्रम केवळ अरेना विकसित करण्यापुरता मर्यादित नसून सांस्कृतिक व आर्थिक चळवळीची ही सुरुवात आहे. या प्रकल्पाद्वारे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती, पर्यटनाला चालना, नवीन उद्योगांच्या संधींची निर्मिती होणार असून देशातील थेट करमणूक, जागतिक कार्यक्रम आणि आभासी अनुभव प्रदान करणारे अग्रणी शहर म्हणून नवी मुंबईचे देशामध्ये स्थान निर्माण होणार आहे.

या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया सुरू असून कल्पनांना मूर्त रूप देण्याकरिता सिडकोची असलेली कटिबद्धता अधोरेखित होत आहे व देशाची थेट करमणुकीची राजधानी म्हणून नवी मुंबईचे स्थान बळकट होत आहे.

# मतदार यादीत नाव शोधणे सोपे जावे याकरिता ऑनलाईन सुविधा उपलब्ध

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणूकांच्या अनुषंगाने मतदारांना मतदार यादीत आपले नाव शोधणे सोपे जावे याकरीता राज्य निवडणूक आयोगामार्फत https://mahasecvoterlist.in/ या संकेत स्थळावर मतदारांना आपले नाव व क्रमांक शोधण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.




नवी मुंबई महानगरपालिकेच्या https://www.nmmc.gov.in/ या संकेतस्थळावर जाऊनही मतदार हे मतदार यादीतील आपले नाव शोधू शकतात. यासाठी मुखपृष्ठावर स्वतंत्र आयकॉन उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

याशिवाय नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या सर्व विभाग कार्यालयांमध्ये असलेल्या सुविधा केंद्रांमध्ये मतदार मदत कक्ष सुरु करण्यात आले असून या ठिकाणी जाऊन नागरिक मतदार यादीतील आपल्या नावाची माहिती जाणून घेऊ शकतात.

## मस्क्युलर डिस्ट्रॉफी रुग्णांसाठी मोठा दिलासा; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केली १०० इलेक्ट्रिक व्हीलचेअरची तात्काळ मदत

**१ वरुन** मस्क्युलर डिस्ट्रॉफी हा दुर्मीळ आजार असला तरी या मुलांची इच्छाशक्ती अत्यंत प्रबळ आहे. या आजारावर लस उपलब्ध व्हावी म्हणून राज्य सरकार केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

फिजिओथेरपी हा या मुलांसाठी अत्यावश्यक उपचार असल्याचे नमूद करत त्यांनी सांगितले की, उपचाराचा खर्च कमी करण्यासाठी सीएसआर निधी, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि लोकसहभागातून व्यापक मदत उभी करण्यात येणार आहे.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन पावले उचलत असल्याचेही शिंदे यांनी सांगितले. एसटी, मेट्रो आणि मोनो रेल्वेत या मुलांच्या प्रवासासाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याचे कार्य प्राधान्याने हाती घेतले जात आहे.

मस्क्युलर डिस्ट्रॉफीग्रस्त मुलांसाठी थेरपी सेंटर सुरू करण्याबाबतचा प्रस्तावही पुढे सरकला असून लवकरच त्यावर कार्यवाही केली जाणार आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

कार्यक्रमाचे आयोजन आणि सहकार्याबद्दल संस्थांचे अभिनंदन करत शिंदे म्हणाले की, या मुलांच्या चेहऱ्यावरचे हास्य टिकवण्यासाठी शासन आणि समाजाकडून जे शक्य आहे ते सर्व प्रयत्न केले जाणार आहेत.

## इंडिगोची हवाई सेवा ठप्प; मुंबईत १०४ उड्डाणे रद्द, हजारो प्रवाशांचे हाल - केंद्र सरकारची मोठी कारवाईची तयारी

**१ वरुन** दरावरही झाला असून तीव्र घसरण नोंदली गेली आहे.

### इंडिगोच्या व्यवस्थापनातील मोठी चूक

या परिस्थितीवर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ''ही सर्व चूक इंडिगोची असून चुकीला माफी मिळणार नाही,'' असा इशारा देत त्यांनी मोठ्या कारवाईची तयारी असल्याचे स्पष्ट केले.

मोहोळ म्हणाले की, पायलट संघटनेच्या मागणीनुसार 'ड्युटीचे तास १० वरून ८ करण्यात आले, परंतु इंडिगोने याची योग्य तयारी न करता सर्व काही शेवटच्या क्षणी ढकलून दिले. त्यामुळे ''मनुष्यबळाची कमतरता' निर्माण झाली आणि संपूर्ण यंत्रणा कोसळली.

### डीजीसीएची तपासणी आणि चौकशी

या गंभीर गोंधळाची दखल घेत नागरी उड्डाण महासंचालनालयाने '४ सदस्यीय चौकशी समिती' नियुक्त केली आहे. तसेच प्रवाशांसाठी नियंत्रण कक्ष उभारण्यात आला असून इंडिगोला नोटीसही बजावण्यात आली आहे.

मोहोळ यांनी सांगितले की, ''चुकीला माफी मिळणार नाही. योग्य ती कठोर कारवाई होणार.''

तसेच कंपनीला वेळ लागेल म्हणून या नवीन नियमांची अंमलबजावणी 'फेब्रुवारीपर्यंत स्थगित' करण्यात आली आहे.

### प्रवाशांची तीव्र नाराजी

विमानतळांवर अडकलेल्या प्रवाशांनी इंडिगोविरुद्ध संताप व्यक्त करत कंपनीला कठोर धडा शिकवावा, अशी मागणी केली आहे.

''उड्डाणे रद्द, वेळोवेळी दिलेली चुकीची माहिती, काऊंटरवरील गोंधळ... सगळ्याची जबाबदारी इंडिगो प्रशासनावरच आहे,'' अशी प्रतिक्रिया प्रवाशांनी दिली.

विभागीय कार्यालय : साईकृपा अपार्टमेंट E-1,/11, C-6 सेकटर 10, नेरुळ नवी मुंबई
विभागीय कार्यालय : रूम नं - J 155/156 से 2, ऐरोली नवी मुंबई

संपादक

सह संपादक : अरुण बिराजदार ९१ ९३२१८ ४७१३६
कार्यकारी संपादक : कुंडलिक कानगुडे ९१७-२१२-३०१३
उप संपादक : विक्रांत औटी ९६१९६२१२८७
कायदेशीर सल्लागार : ॲड.रचना एस. भालके. (B.Com,LL.B. M.Phil) वकील उच्च न्यायालय

जनतेचा सावधान महाराष्ट्र
निर्भीड आणि निष्पक्ष

# मुंबईच्या कचऱ्याने शहराची माती

## देवनार, कांजूरमार्ग कचराभूमीतील धुरामुळे वाशी आणि परिसराची घुसमट

नवी मुंबई शहरातील वाढत्या वायुप्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी नवी मुंबई महापालिकेने मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहीम सुरू केली असली, तरी हवा गुणवत्ता निर्देशांकात (एक्यूआय) लक्षणीय सुधारणा झालेली नाही. महापालिकेने बांधकाम प्रकल्प, दगडखाणी, सिमेंट उद्योग आणि रस्त्यांवरील धूळ नियंत्रणावर विशेष भर देऊन रस्ते प्रक्रियाकृत पाण्याने धुण्याची मोहीम राबवली. मात्र, देवनार आणि कांजूरमार्ग कचराभूमीतून उठणाऱ्या धुरामुळे या प्रयत्नांना मागे ढकलले जात असल्याचे पर्यावरणतज्ज्ञांचे मत आहे.



काही दिवसांपूर्वी कांजूरमार्ग कचराभूमीत लागलेल्या आगीचा दाट धूर पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहणाऱ्या वाऱ्याबरोबर वाशी व आसपासच्या भागात पसरला. सकाळपासून शहरात धुरक्यांचे धूसर आवरण आणि उग्र दर्प जाणवत होता. महापालिकेच्या पर्यावरण विभागानुसार, देवनार आणि कांजूरमार्ग येथील वारंवार लागणाऱ्या आगीमुळे मोठ्या प्रमाणात धूर शहरात प्रवेश करतो. त्यात औद्योगिक वसाहतीतील रासायनिक उत्सर्जन आणि नवी मुंबई विमानतळाच्या कामातून निर्माण होणारी धूळ यांचीही भर पडत असल्याचे सांगण्यात आले आहे.

महापालिकेची व्यापक स्वच्छता मोहीम सुरू असताना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या श्समीर ॲपश नुसार गुरुवारी शहराचा सरासरी एक्यूआय ११९ इतका नोंदवला गेला, ही पातळी मध्यम मानली जात असली, तरी संवेदनशील व्यक्तींना तब्येतीच्या समस्या उद्भवू शकतात. नेरूळमध्ये सर्वाधिक १५३ एक्यूआय नोंदला गेला. तर पीएम १० धूलिकणांची पातळीही १२० प्रति घनमीटरपर्यंत पोहोचल्याचे नोंदणीतून दिसून आले, जी आरोग्यास धोकादायक ठरू शकते. काही खासगी संकेतस्थळांवर नवी मुंबईतील हवा 'खराब ते अतिखराब' असल्याचे दाखवल्याने नागरिकांमध्ये आकडेवारीबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

पर्यावरण विभागाचा दाव्यानुसार, महापालिकेकडून सातत्याने उपाययोजना केल्या जात असल्या, तरी शहरा बाहेरील कचराभूमीतील जळणारा कचरा, विमानतळ प्रकल्पातील धूळ व वाऱ्याचे बदलते स्वरूप यामुळे शहरातील वायुप्रदूषणाची स्थिती बिकट झाली आहे. परंतु, या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी महापालिका युद्धपातळीवर प्रयत्नशील असल्याचे विभागाने स्पष्ट केले.

महापालिकेकडून वायुप्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्यात येत असल्या तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची जबाबदारीही यात महत्त्वाची आहे. त्यामुळे शहरांतर्गत वायुप्रदूषण रोखण्यासाठी प्रशासन काम करत असताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळानेही याकडे गांभीयनि लक्ष देऊन संबंधीतांवर योग्यती कारवाई करावी अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून केली जात आहे.

## पनवेलमध्ये मालगाडी घसरून वाहतूक विस्कळीत



**पनवेल :** पनवेल रेल्वे स्थानकाच्या अगदी काही अंतरावर गुरुवारी दुपारी माल गाडी रुळावरून घसरल्याने सीएसटीएन - जेएनपीटी या लोहमार्गावरील रेल्वे वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. मालगाड्यांची ताशी मोठ्या प्रमाणात ये - जा असणाऱ्या या महत्त्वाच्या मार्गावर झालेल्या या अपघातामुळे तात्पुरता गोंधळ निर्माण झाला. दिवसाला सुमारे १३० मालगाड्या धावणाऱ्या या मार्गावर ही घटना झाल्याने रेल्वे प्रशासन सतर्क झाले. या अपघातानंतर काही तास माल गाड्यांची वाहतूक विस्कळीत झाली असली तरी प्रवासी वाहतुकीला कोणताही त्रास जाणवला नसल्याचा दावा पनवेल रेल्वे प्रशासनाने केला आहे. रेल्वे नियंत्रण कक्षाकडून मिळालेल्या माहितीनुसार, सीएसटीएनइजेएनपीटी बीएल सी मालगाडी पनवेल ४५ पाचव्या स्थानकाच्या फलाटाजवळून जात असताना एका कंटेनर ट्रॉलीचा १२ वाजून २५ मिनिटांनी अपघात झाला आणि ती रुळावरून घसरली. कळंबोलीकडे जाणाऱ्या पॉईंटचर आणि फलाट क्रमांक ५ च्या क्रॉस - ओव्हर पॉईंटवर मालगाडी घसरली. त्यामुळे अप - डाउन मुख्य लाईनवरची वाहतूक प्रभावित झाली. अपघातग्रस्त कंटेनर नंतर फलाटावरून हटविण्यात आला. घटनास्थळ नवीन पनवेल पुलाखाली असल्याने स्थानक परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

जेएनपीटीकडे जाणारी ही मालगाडी वळणावर येताच काही डने डगमगले आणि रुळाबाहेर गेले. जीवितहानी टळली असली तरी काही डब्यांचे नुकसान झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

मालवाहतुकीवर या अपघाताचा तात्पुरता परिणाम झाला. रेल्वे सुरक्षा दल आणि पनवेल पोलिसांनी परिसरात बंदोबस्त तैनात करून परिस्थिती नियंत्रणात ठेवली. या मार्गावरून प्रवासी गाड्या धावत नसल्याने प्रवाशांना या अपघाताचा मोठा त्रास जाणवला नाही.

## बंदी असतानाही 'पर्ससीन नेट'ने मासेमारी

**पालघर :** शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागाने बंदी घातलेल्या 'पर्ससीन नेट' आणि 'एलईडी' पद्धतीने मासेमारी केल्याप्रकरणी पालघरच्या सातपाटी समुद्रात मोठी कारवाई करण्यात आली. यात पालघर मत्स्यव्यवसाय विभागाने रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथील सहा ट्रॉलर बोटींवर कारवाई करत प्रत्येकी एक लाख रुपयांचा दंड ठोठावला.

पालघर जिल्ह्याच्या किनाऱ्यापासून समुद्रात १२ नॉटिकल सागरी मैल अंतरापर्यंत पर्ससीन आणि एल ईडी मासेमारी करण्यास बंदी आहे. मात्र, परजिल्ह्यातील मच्छीमारांकडून या भागात मोठ्या प्रमाणात अवैध मासेमारी सुरू असते. त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी मच्छीमार सोसायटी व संघटनांकडून अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. या मागणीची दखल घेत मत्स्य विभागाने १२ नॉटिकल सागरी मैलांवरील मासेमारीवर नियंत्रण आणण्यासाठी ड्रोनसर्वे सुरू करण्याचा निर्णय घेतला. गस्तीनौकांच्या माध्यमातून गस्त घालून कडक कारवाईची घोषणाही करण्यात आली होती. मत्सविभाग ड्रोनद्वारे दिवसांतून सद्याः स्थितीत तीनवेळा येथे सर्वे करते.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथील श्री पानसाई माता, पद्मावती, अंगारकी, वरदविनायक, धनवंती, अंबामाउली या सहा ट्रॉलर्सवर कारवाई करण्यात आली. अवैध मासेमारी केल्याप्रकरणी प्रत्येकी एक लाख अशी एकूण सहा लाख रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली.

## उरणमध्ये कचरा जाळल्याने प्रदूषणात वाढ

**उरण :** येथील अनेक मार्गांवर मोठ्या प्रमाणात टाकण्यात आलेल्या कचऱ्याला सध्या आगी लावल्या जात आहेत. त्यामुळे आधीच दुषित झालेल्या उरणच्या हवा प्रदूषणात आणखी वाढ होऊ लागली आहे. या कचऱ्यातून निघणारा धूर हा प्रवासी आणि नागरिकांना हानिकारक ठरत आहे. त्यामुळे या आर्गीवर नियंत्रण आणण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

उरण शहर आणि तालुक्याला कचराभूमी नसल्याने कचरा समस्या गंभीर बनली आहे. त्यामुळे तालुक्यातील अनेक मुख्य मार्ग कचऱ्याने ओसंडून वाहू लागले आहेत. उरण तालुक्यातील अनेक गावात सांडपाणी व्यवस्थापन व कचरा व्यवस्थापनाच्या शून्य दिसून येत आहे. यामुळे ग्रामीण भाग त्याचबरोबर नव्याने निर्माण होणारा शहरी परिसरही बकाल दिसत आहेत. उरण तालुक्यातील जवळपास सर्वच गावातून गोळा केलेला कचरा रहदारीच्या रस्त्यांवर टाकून या ग्रामपंचायतींनी रस्त्यांचे डंपिंग ग्राउंड केल्याची स्थिती आहे. या कचऱ्यामुळे नागरिकांसोबत मुक्या प्राण्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या कचऱ्याला दररोज आग लावल्यामुळे प्रदूषणचा धोका वाढला आहे.

उरण तालुक्यातील निम्मा परिसर हा सिडकोच्या अखत्यारित आहे. द्रोणागिरी नोड मधील सेक्टर ११ आणि ३० मध्ये घनकचरा प्रक्रिया करण्यासाठी भूखंड आरक्षित ठेवण्यात आला आहे. तर जासई येथे सिडकोने घनकचरा प्रकल्प उभारला होता. हा प्रकल्प गेली अनेक वर्षे बंद पडला आहे. त्यामुळे या परिसरातील कचऱ्याच्या समस्येत वाढ झाली. हा प्रकल्प सुरू करण्याची मागणी येथील ग्रामस्थांकडून केली जात आहे. दरम्यान, उरण तालुक्यातील कचरा आणि सांडपाणी व्यवस्थापनाच्या नियोजनासाठी पंचायत समितीकडून पाहणी करून निर्णय घेण्यात येईल अशी माहिती उरण पंचायत समितीने दिली.

## अपघातात तरुणाचा मृत्यू

**वाडा :** रस्त्याच्या अपूर्ण कामामुळे झालेल्या दुचाकीच्या अपघातात तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना वाडा शहरात घडली, अभिषेक ढाकरे (वय १९) असे मृताचे नाव आहे. अभिषेक मंगलपार्क परिसरात कटुंबासमवेत राहत होता. वडिलांनी खरेदी केलेली नवी दुचाकी घेऊन अभिषेक पेढे खरेदीसाठी बाजारपेठेत निघाला होता. सुयोग नगर येथील रस्त्यालगत त्याची भरधाव दुचाकी मातीच्या मोठ्या ढिगाऱ्यावर चढल्याने अभिषेकचे दुचाकीवरील नियंत्रण सुटून ती रस्त्यालगत विजेच्या खांबावर आदळली. यात अभिषेकचा जागीच मृत्यू झाला. अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली.

## पं. कृष्णचंद्र गुप्त यांना विचित्र विना रत्न पुरस्कार प्रदान




**नवी मुंबई (प्रतिनिधी):** वीणा वेणू आर्ट फाउंडेशनच्या वतीने नवी मुंबईतील उलवे सेक्टर १० डेल्टा कॉम्प्लेक्स मधील फाउंडेशनच्या हॉल मध्ये जागतिक पहिला विचित्र वीणा दिवस साजरा करण्यात आला.

यावेळी विचित्र वीणा रत्न सन्मान पुरस्कार भारतातील जेष्ठ कलाकार पं. कृष्णचंद्र गुप्त यांना वीणा वेणू आर्ट फाउंडेशनच्या संचालिका डॉ. राधिका वीणासाधिका शुभ हस्ते देण्यात आला.

विचित्र वीणा या प्राचीन भारतीय वाद्यांचा प्रसार आणि प्रचार व्हावा, म्हणून विचित्र वीणेच्या विविध पैलूंना स्पर्श करणारी डॉ. राधिका लिखित सात विशेष ग्रंथ पुस्तके पद्मश्री पंडित तेजेंद्र नारायण मजूमदार यांच्या हस्ते यावेळी प्रकाशित करण्यात आली. यावेळी ख्यातनाम गायिका शश्वती मंडल (दिल्ली) यासह मुंबई, भोपाळ आणि पुणे येथील विचित्र विना कलाकार उपस्थित होते. दरवर्षी १९ ते २५ नोव्हेंबर विचित्र विना जागतिक सप्ताह उत्सव साजरा करण्यात येईल असा एकमुखी ठराव करण्यात आला.

## अंड्यांच्या दरात वाढ



**नवी मुंबई :** नवी मुंबई व आसपासच्या उपनगरांमध्ये गेल्या काही आठवड्यांपासून अंड्यांच्या दरात लक्षणीय वाढ झाली आहे. हिवाळ्याची सुरुवात, ग्राहकांकडून वाढती मागणी आणि पुरवठ्यातील चढउतार यामुळे किरकोळ बाजारात दर चढले आहेत. सध्या ब्रॉयलर अंड्यांचा दर डझनाला ९० रुपये असून देशी अंड्यांसाठी प्रति नग १६ ते १८ रुपये मोजावे लागत आहेत.

काही पोल्ट्री फॉर्ममध्ये उत्पादन घटल्याने घाऊक दरातही वाढ झाली आहे. हिवाळ्यात अंड्यांची मागणी नैसर्गिकरीत्या वाढतेय मात्र उत्पादनात झालेल्या घटीमुळे पुरवठा कमी पडतो आणि त्याचा परिणाम किमतींवर होतो, असे किरकोळ विक्रेत्यांचे म्हणणे आहे. तर पोल्ट्री व्यावसायिकांच्या मते, तापमान आणखी खाली गेल्यास येत्या काही आठवड्यांत अंड्यांची मागणी वाढू शकते. पुरवठा स्थिर न झाल्यास किमतीत आणखी वाढ होण्याची शक्यता असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

देशी अंड्यांना जास्त मागणी देशी कोंबडीच्या अंड्यांचे दर आणखी उंचावले असून वाशी, नेरुळ, बेलापूर, पनवेल परिसरात देशी अंडी डझनाला १९२ ते २१६ रुपये दराने विकली जात आहेत. घरगुती, पौष्टिक आहार आणि आयुर्वेदिक वापरासाठी देशी अंड्यांची जास्त मागणी असल्याने या वर्गातील दर जास्तच राहत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

# ७ हजारहून अधिक नागरिकांच्या उत्साही सहभागातून 'स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉन २०२५' यशस्वी

### नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केली ३२ कि.मी. हाफ मॅरेथॉन यशस्वीरित्या पूर्ण

स्वच्छ आणि सुंदर नवी मुंबईचा जागर करीत ७ हजाराहून अधिक नागरिकांनी उत्साहाने सहभागी होत पामबीच मार्गावर आयोजित 'स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉन २०२५' हा उपक्रम यशस्वी केला. सकाळी ठीक ४.३० वा सुरू झालेल्या हाफ मॅरेथॉनमधील सर्वाधिक ३२ किमी. अंतराच्या मुख्य गटात नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी स्वतरू धावपटू म्हणून सहभागी होत नागरिकांसमवेत स्वच्छतेचा संदेश प्रसारित करीत ही हाफ मॅरेथॉन यशस्वीपणे पूर्ण केली.




५, १०, २१ आणि ३२ किमी अंतराच्या वेगवेगळ्या गटांमध्ये लेट्स सेलिब्रेट फिटनेस यांच्या माध्यमातून नवी मुंबई महानगरपालिकेच्या सहयोगाने श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी शताब्दीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉनमध्ये विविध वयोगटातील स्त्री - पुरुष उत्साहाने सहभागी झाले होते. यामध्ये युवकांची संख्या लक्षणीय होती.

सकाळी ४.३० वा. या हाफ मॅरेथॉन मधील ३२ किलोमीटर अंतराच्या गटाला सुरूवात होऊनही इतक्या पहाटे मोठ्या संख्येने आणि उत्साहाने धावपटू उपस्थित होते. नागरिकांनी उत्साही व उत्स्फूर्तपणे सहभागी होत स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉन्घ उपक्रम यशस्वी केल्याबद्दल नागरिकांचे आभार व्यक्त करीत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिव्यांगांनीही सहभागी होत प्रेरणादायी उपस्थिती दर्शविली याचा विशेष उल्लेख केला.

स्वच्छ व पर्यावरणशील शहर ही नवी मुंबईची ओळख असून आरोग्यपूर्ण शहराचे ध्येय नजरेसमोर ठेवून आयोजित केलेल्या हाफ मॅरेथॉन उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी झाल्याबद्दल नागरिकांचे तसेच हाफ मॅरेथॉन आयोजनात सहयोग देणाऱ्या लेट्स सेलिब्रेट फिटनेस आणि नवी मुंबई गुरुद्वारा सुप्रीम कौन्सिल व गुरुद्वारा श्री दशमेश दरबार आणि इतर सहयोगी संस्थांचे आयुक्तांनी आभार मानले.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्री सुनील पवार, प्रशासन विभागाचे उपायुक्त श्री किसनराव पलांडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ अजय गडदे, परिमंडळ १ चे उपायुक्त श्री सोमनाथ पोटरे, परिमंडळ २ चे उपायुक्त श्री. संजय शिंदे, मालमत्ता कर विभागाचे उपायुक्त डॉ अमोल पालवे, अतिरिक्त शहर अभियंता श्री. अरविंद शिंदे, क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपायुक्त श्रीम.अभिलाषा म्हात्रे – पाटील, कार्यकारी अभियंता श्री. प्रवीण गाडे व श्री राजेश पवार, क्रीडा अधिकारी श्री.रेवप्पा गुरव, बेलापूरचे विभाग अधिकारी श्री. प्रशांत नेरकर, उपअभियंता श्री.गजानन पुरी, उप स्वच्छता अधिकारी श्री.राजेंद्र इंगळे आणि इतर अधिकारी उपस्थित होते. माजी खासदार श्री.संजीव नाईक यांनीही याप्रसंगी आवर्जून उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. लेट्स सेलिब्रेट फिटनेस संस्थेच्या प्रमुख श्रीम. रिचा समित व नवी मुंबई गुरुव्दारा सुप्रीम कौन्सिलचे पदाधिकारी व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

# जागतिक दिव्यांग दिनी इटीसी केंद्रामार्फत आयोजित जनजागृती रॅलीला उत्साही प्रतिसाद

नवी मुंबई महानगरपालिका इटीसी अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्राद्वारे दिव्यांगत्वाबाबत जनजागृती करण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जातात. याचाच एक भाग म्हणून ०३ डिसेंबर म्हणजेच जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून विशेष जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच संपूर्ण डिसेंबर महिन्यामध्ये विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. समाजामध्ये दिव्यांगत्वाबाबत जनजागृती करणे तसेच दिव्यांग मुलांना प्रोत्साहित करणे या हेतूने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.




०२ डिसेंबर रोजी इटीसी केंद्रातील दिव्यांग मुलांच्या पालकांसाठी कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत डॉ.अमृता जोशी आणि श्री.सागर पगार यांनी पालकांना सुजाण पालकत्व या विषयावर बहुमोल मार्गदर्शन केले.

संपूर्ण डिसेंबर महिन्यामध्ये होणाऱ्या विविध उपक्रमांपैकी एक महत्वाचा उपक्रम म्हणजे आज ३ डिसेंबर रोजी दिव्यांगत्वाबाबत जनजागृती करणेकरिता आयोजित करण्यात येत आलेली रॅली. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिव्यांगत्वाविषयी जनजागृतीकरिता विशेष रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नमुंमपा इटीसी केंद्रातील कर्मचारी, केंद्रामधील विविध प्रवर्गातील दिव्यांग मुले व त्यांचे पालक तसेच निर्भया फाऊंडेशनचे संस्थापक श्री. मनोज बर्डे व त्यांचे सहकारी उपस्थितहोते.

या रॅलीचा प्रारंभ इटीसी केंद्रामधून करण्यात आला. इटीसी केंद्र ते वाशी स्टेशन परिसर येथे रॅली आली असता मानवी साखळी करून दिव्यांगत्वाबाबत माहिती दर्शविणारे फलक व घोषणा याद्वारे दिव्यांगत्वाबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना इटीसी केंद्राच्या संचालिका डॉ. अनुराधा बाबर यांनी ३ डिसेंबर हा दिव्यांगत्व जनजागृतीसाठी महत्त्वाचा दिवस असल्याचे सांगितले. समाजातील सर्व स्तरांवर दिव्यांगांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

या रॅलीची सांगता पुन्हा इटीसी केंद्रामध्ये येऊन करण्यात आली. रॅलीनंतर दिव्यांग मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले. या रॅलीमध्ये एकूण ४४० दिव्यांग मुले त्यांच्या पालकांसह उपस्थित होती. या रॅलीसाठी केंद्राच्या संचालिका डॉ.अनुराधा बाबर यांनी स्वतः उपस्थित राहून सर्व दिव्यांग मुले व पालक यांचा उत्साह वाढविला.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिव्यांगत्वाबाबत जनजागृती करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करीत यासाठी विविध उपक्रम राबवण्याकरिता नवी मुंबई महापालिका नेहमीच प्रयत्नशील आहे असे मत व्यक्त केले. अतिरिक्त आयुक्त श्री सुनील पवार यांनीही दिव्यांगत्वामुळे खचून न जाता शिक्षण, प्रशिक्षण घेऊन समाजाचा एक महत्त्वाचा घटक बनण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले. या रॅलीचे आयोजन इटीसी केंद्र संचालिका डॉ. अनुराधा बाबर यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले. रॅलीचे नियोजन तसेच नियंत्रण व देखरेख इटीसी केंद्राच्या अधीक्षक व कर्णबधिर विभाग, मतिमंद विभाग यांचे शैक्षणिक व्यवस्थापक यांनी केले.

## बिलियन हार्ट्स बीटिंग फाउंडेशनचा सीएसआर उपक्रम

**नवी मुंबई, ८ डिसेंबर २०२५ :** अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने आज बिलियन हार्ट्स बीटिंग फाउंडेशनच्या तीन प्रगत जीवन - समर्थन रुग्णवाहिकांच्या अधिकृत लॉंचिंगनिमित्त पत्रकार कार्यक्रमाचे आयोजन केले. या उपक्रमाचा उद्देश प्रदेशातील आपत्कालीन वैद्यकीय सेवांची क्षमता वाढवणे आणि गंभीर अवस्थेत असलेल्या रुग्णांना वेळेवर उपचार मिळवून देणे असा आहे. या रुग्णवाहिकांचा वापर यापूर्वीच नवी मुंबईतील विशेष वैद्यकीय शिबिरांमध्ये करण्यात आला असून त्यांनी आतापर्यंत २३ हजारांहून अधिक लोकांपर्यंत सेवा पोहोचवली आहे.




श्री.अरूनेश पुनेथा, पश्चिम विभागाचे - सीईओ, अपोलो हॉस्पिटल्स म्हणाले, ''रुग्णालयात आणि रुग्णालयाच्या बाहेरही आपत्कालीन सेवांची साखळी अधिक मजबूत करणे हाच आमचा नेहमीच मुख्य हेतू राहिला आहे. या प्रगत लाइफ - सपोर्ट रुग्णवाहिकांचा समावेशामुळे जीवन वाचविण्यासाठी निर्णायक ठरणार्या सुरुवातीच्या काळात रुग्णांपर्यंत सेवा पोहोचण्याची आमची क्षमता मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. आरोग्यसेवा संस्था आणि उदार उद्योजकीय संस्था एकत्र येतात तेव्हा समाजासाठी किती मोठे काम उभे राहू शकते, याचे हे उत्तम उदाहरण आहे.''

सुश्री सुधा झिजारिया, सीएसआर ऑपरेशन्स प्रमुख, बिलियन हार्ट्स बीटिंग यांनी व्यक्त केले,''गरजूंपर्यंत मदत किती वेगाने पोहोचते, याद्वारेच आम्ही यशाचे मोजमाप करतो. या रुग्णवाहिका वैद्यकीय संकट आणि उपचार यांच्यातील महत्त्वाची दरी भरुन काढतील - रुग्णालयांपासून घरांपर्यंत, शहरांपासून समुदायांपर्यंत हे आमचे ध्येय सुनिश्चित करतील.''

प्री - हॉस्पिटल केअरचे महत्त्व अधोरेखित करताना अपोलो हॉस्पिटल्सच्या पश्चिमी क्षेत्रातील आपत्कालीन विभागाचे संचालक डॉ. नितीन जगासिया म्हणाले, ''जेव्हा मदतीसाठी पहिला फोन येतो तेव्हाच आपत्कालीन उपचारांची सुरुवात होते, रुग्णालयात पोहोचल्यावर नव्हे. या रुग्णवाहिका म्हणजे चालते फिरते अतिदक्षता विभाग असून त्या जीवन वाचविण्यासाठी निर्णायक ठरणार्या सुरुवातीच्या काळात तज्ज्ञांद्वारे उपचार देण्याकरिता सज्ज आहेत. या सहयोगामुळे आमची सेवा अधिक व्यापक होणार आहे तसेच वेळ वाचवण्याचे आणि जीवन वाचवण्याचे आमचे ध्येय साध्य करण्यास अधिक क्षमता मिळेल.''

जनतेचा सावधान महाराष्ट्र
निर्भीड आणि निष्पक्ष

# बेलापूर जनसंपर्क कार्यालयात मा. आमदार संदीप नाईक यांच्या उपस्थितीत नागरी कामांसाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी

**प्रतिनिधी : जनतेचा सावधान महाराष्ट्र :** बेलापूर येथील जनसंपर्क कार्यालयात आज विविध भागांतील नागरिक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी आणि युवा वर्गाने मोठ्या संख्येने भेट देत आपले प्रश्न, तक्रारी आणि मागण्या मांडल्या. विशेष म्हणजे, संपूर्ण जनसंवाद प्रक्रिया 'माजी आमदार संदीप नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली' पार पडली.

नागरिकांनी आरोग्यसेवा, शैक्षणिक सुविधा, क्रीडा संकुल, नागरी सोयी, स्थानिक रोजगार तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणाबाबत विविध मुद्दे मांडले. आरोग्य केंद्रांची वाढ, शाळांमधील सुविधा



सुधारणा, क्रीडांगणांची उभारणी, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरुस्ती आणि सार्वजनिक ठिकाणांच्या देखभालीसंबंधी अनेक मागण्या नोंदवल्या गेल्या.

यावेळी माजी आमदार संदीप नाईक यांनी प्रत्येक नागरिकाचे प्रश्न मनापासून ऐकून घेतले. तक्रारी, मागण्या आणि सूचना व्यवस्थित नोंदवून संबंधित विभागांशी समन्वय साधून 'लवकरात लवकर सकारात्मक उपाययोजना करण्यात येतील', असा विश्वास त्यांनी नागरिकांना दिला.

ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी विशेष उपक्रम, शासकीय योजनांची अंमल बजावणी आणि युवकांसाठी रोजगारवृद्धी या विषयांवरही सविस्तर चर्चा झाली.

नागरिकांच्या सर्व प्रश्नांना गांभीर्याने हाताळून बेलापूर विभागातील समस्या प्राधान्याने सोडवल्या जातील, असेही नाईक यांनी आश्वासन दिले.

# नवी मुंबई महानगरपालिका चषक महाराष्ट्र राज्य ज्युनिअर व्हॉलीबॉल अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा २०२५-२६ चा दिमाखदार शुभारंभ

कोणत्याही खेळाची आवड जीवनात व्यक्तिमत्व विकासासाठी तसेच कठीण प्रसंगात ला सामोरे जाण्याची क्षमता वाढवण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरते, त्यामुळे खेळणे सोडू नका असे सांगत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नवी दिल्ली मुंबई महानगरपालिका विविध खेळांना तसेच खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी नेहमीच संपूर्ण सहकार्य करेल असे प्रतिपादन केले.




नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन यांच्या मान्यतेने, ठाणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिशन व नवी मुंबई घ्मॅच्युअर व्हॉलीबॉल असोसिएशन तसेच कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, वाशी यांच्या सहकार्याने आयोजित 'नवी मुंबई महानगरपालिका चषक महाराष्ट्र राज्य ज्युनिअर व्हॉलीबॉल अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा २०२५-२६' च्या शुभारंभप्रसंगी ते आपले मनोगत व्यक्त करीत होते.

याप्रसंगी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या समवेत क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपायुक्त श्रीम.अभिलाषा म्हात्रे, क्रीडा अधिकारी श्री रेवप्पा गुरव, महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल असोसिएशनचे चेअरमन श्री. संजय नाईक व सचिव श्री. निलेश जगताप, मुंबईचे विभागीय सचिव श्री. धनंजय वनमाळी, संभाजीनगरचे विभागीय सचिव श्री.सतीश पाठक, कोल्हापूरचे विभागीय सचिव श्री.प्रितम खोत, पुण्याचे विभागीय सचिव श्री.विलास घोगरे, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक श्री.अजित पाटील, पंचप्रमुख श्री. बाबू आचरेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

दि.६ व ७ डिसेंबर २०२५ रोजी वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या मैदानात नवी मुंबई महानगरपालिका चषक महाराष्ट्र राज्य ज्युनिअर व्हॉलीबॉल अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा २०२४-२५ संपन्न होत असून यामध्ये मुंबई, अमरावती, संभाजीनगर, नाशिक, पुणे, नागपूर, लातूर, कोल्हापूर असे आठ विभागांचे पुरुष व महिलांचे संघ सहभागी झाले आहेत. या स्पर्धेत गुणवत्तापूर्ण खेळ करणाऱ्या खेळाडूंची निवड करून महाराष्ट्र राज्याचा पुरुष व महिलांचा ज्युनियर व्हॉलीबॉल संघ तयार करण्यात येणार असून हा संघ राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत खेळणार आहे. त्यामुळे सहभागी सर्वच खेळाडूंसाठी या स्पर्धेतील कामगिरी महत्त्वाची आहे.

याप्रसंगी बोलताना क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपायुक्त श्रीम.अभिलाषा म्हात्रे यांनी स्वतः खेळाडू असल्यामुळे उपायुक्त म्हणून स्पर्धांचे आयोजन करताना खेळाडूंना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये याची काळजी घेते असे सांगितले. आयुक्त महोदयांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिका विविध खेळांना पोषक वातावरण निर्माण करीत असल्याची माहिती देत त्यांनी सहभागी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे सचिव श्री.निलेश जगताप यांनी स्वच्छ, सुंदर असा नावलौकिक असणारी नवी मुंबई महानगरपालिका कोणतेही काम नियोजनबद्ध करते, त्यामुळे या स्पर्धांचे आयोजनही उत्तम रितीने केले असल्याचे मत व्यक्त केले.

महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना मानपत्र देऊन विशेष सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे उपायुक्त श्रीम.अभिलाषा म्हात्रे, क्रीडा अधिकारी श्री रेवप्पा गुरव व मुंबईचे विभागीय सचिव श्री.धनंजय वनमाळी यांचाही सन्मान करण्यात आला.

सेंट झेवियर्स हायस्कूल नेरूळ मधील एनएसएस युनिटच्या विद्यार्थ्यांनी संचाल नाद्वारे स्पर्धेची सुरुवात केली. पुरुष गटातील शुभारंभाचा सामना मुंबई विभाग आणि अमरावती विभाग तसेच महिला गटातील शुभारंभाचा सामना मुंबई विभाग आणि कोल्हापूर विभाग यांच्यामध्ये खेळविण्यात आला. आयुक्त महोदय व इतर मान्यवरांनी खेळाडूंची ओळख करून घेत क्रीडांगणाचे पूजन करून स्पर्धेचा प्रत्यक्ष शुभारंभ केला.

नवी मुंबई शहरामध्ये विविध खेळांना पोषक वातावरण निर्मितीसाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने विविध उपक्रमांचे सातत्यपूर्ण आयोजन केले जात आहे. तसेच खेळांसाठी ठोस पायाभूत सुविधांची उपलब्धता करून देण्यावर भर दिला जात आहे. त्या धर्तीवर आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ रविवार, दि ७ डिसेंबर २०२५ रोजी, सायंकाळी ७ वा. संपन्न होणार असून याप्रसंगी तसेच दिवसभर चालणाऱ्या सामन्यांप्रसंगी क्रीडाप्रेमींनी उपस्थित राहून राज्यभरातून आलेल्या व्हॉलीबॉल खेळाडूंना प्रोत्साहित करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# घणसोलीत घरात घुसून जबरी चोरी व चाकू हल्ल्याचा गुन्हा ४८ तासांत रबाळे पोलिसांनी केला उघड

**प्रतिनिधी : कुंडलिक कानगुडे : नवी मुंबई :** घणसोलीतील सदगुरू हॉस्पीटल शेजारील झोपडपट्टी परिसरात घरात घुसून मोबाईल चोरी करताना फिर्यादीवर चाकू हल्ला करणाऱ्या दोन विधीसंघर्षित बालकांचा शोध घेऊन रबाळे पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत गुन्हा उघड केला आहे. विशेष म्हणजे ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांच्या थेट मार्गदर्शनाखाली अत्यंत काटेकोरपणे हाती घेण्यात आली. त्यांच्या दिशादर्शनामुळे तपास पथकाला महत्त्वाचे धागेदोरे मिळाले आणि आरोपी शोधण्यास मोठी मदत झाली.

फिर्यादी राजू साईनाथ कुमार, वय ३० वर्ष, रा. सदगुरू हॉस्पीटल शेजारील झोपडपट्टी, यांनी दिलेल्या माहितीनुसार घटना २९ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास घडली. दोन इसमांनी त्यांच्या घरात परवानगीशिवाय प्रवेश करून मोबाईल चोरी केला. फिर्यादी यांनी प्रतिकार केल्यावर आरोपींनी चाकूने पोट व पाठीवर




वार करून गंभीर दुखापत केली. त्यानंतर सायन हॉस्पिटलच्या सर्जरी वॉर्डमधून दिलेल्या तक्रारीवरून १ डिसेंबर रोजी गुन्हा नोंद झाला.

गुन्हा नोंद झाल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांनी स्वतः तपासाची दिशा निश्चित केली. त्यांच्या आदेशानुसार पो.नि. सचिन गवळी (गुन्हे) व पो.नि. श्याम बनसोडे (प्रशासन) यांच्या देखरेखीखाली सपोनि अविनाश पाळदे यांच्या नेतृत्वाखालील गुन्हे प्रकटीकरण पथकाने तातडीने काम सुरू केले. घटनास्थळाची पाहणी, सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण, तसेच गुप्त बातमीदारांच्या माहितीद्वारे पथकाने दोन्ही विधीसंघर्षित बालकांना ताब्यात घेतले. गुन्ह्यात वापरलेला चाकूही जप्त करण्यात आला.

तपास पथकात सपोनि अविनाश पाळदे, पोहवा प्रसाद वायंगणकर, पोना विजय करंकाळ, पोना प्रल्हाद जाधव, पोशि प्रविण भोपी, पोशि अभिजीत राळे, पोशि राजेश तडवी आणि पोशि राहुल साळुंखे यांचा समावेश होता.

संपूर्ण कारवाईवर वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांनी बारकाईने लक्ष ठेवले. त्यांच्या प्रभावी मार्गदर्शनामुळे हा गंभीर गुन्हा अल्पावधीत उघड झाला असून परिसरातील नागरिकांनी पोलिसांच्या या तातडीच्या व प्रभावी कामगिरीचे कौतुक केले आहे.

# भव्य हरिनाम सप्ताहाची नेरुळमध्ये उत्साहपूर्ण प्रदक्षिणा: समाजएकतेचा अनोखा जल्लोष



**प्रतिनिधी : जनतेचा सावधान महाराष्ट्र :** नेरुळ येथील भिमाशंकर सामाजिक संस्थेच्या २५ व्या रौप्य महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाची भव्य प्रदक्षिणा फेरी नेरुळमध्ये उत्साहात पार पडली. धार्मिक भाव, सामाजिक एकता आणि सांप्रदायिक ऐक्याचा संदेश देणाऱ्या या शोभायात्रेत शेकडो भाविकांनी सहभाग घेतला.


या भव्य सोहळ्यास मा. नगरसेवक तथा सभागृह नेते रविंद्र इथापे, संस्थापक अध्यक्ष पांडूतात्या डुंबरे, भिमाशंकर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष म. म. नायकोडी, सचिव लक्ष्मण कोरडे, मोहन डोंगरे, अशोक हिंगे, दत्ताशेठ नलावडे तसेच सोसायटीचे अध्यक्ष, संचालक मंडळ व उत्सव मंडळाचे सदस्य उपस्थित होते. एनसीआरडी स्टर्लिंग स्कूलच्या विद्यार्थ्यांनी लेझीम पथकासह भव्य सादरीकरण करत वातावरण अधिक मंगलमय केले. ढोल - ताशे, बँड, टाळ - मृदुंग, वारकरी दिंडी आणि टाळकरी यांच्या सहभागामुळे प्रदक्षिणा फेरीला विशेष आकर्षक व सांस्कृतिक स्वरूप लाभले. संपूर्ण मिरवणूक अतिशय शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात आली होती.

हा अखंड हरिनाम सप्ताह ७ डिसेंबर ते १४ डिसेंबर २०२५ दरम्यान भिमाशंकरच्या गणेश मैदानात भव्य स्वरूपात संपन्न होणार आहे. महाराष्ट्रातील नामवंत हरिभक्त पारायण व कीर्तनकार महाराजांचे कीर्तन, प्रवचन तसेच दररोज हजार भक्तांसाठी अन्नदान या काळात आयोजित केले जाणार आहे.

संस्थेच्या वतीने परिसरातील सर्व नागरिक, हरिभक्त व भाविकांना सांप्रदायिक एकतेने या उत्सवात सहभागी होऊन हरिनाम सप्ताहाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# रायगड जिल्ह्यात ४५४ कुपोषित बालके

**अलिबाग :** महिला व बाल विकास विभागाने केलेल्या सर्वेक्षणात रायगड जिल्ह्यातल ४५४ कुपोषित बालके आढळून आली आहेत. ज्यात ६१ तीव्र तर ३९३ मध्यम कुपोषित बालकांचा समावेश आहे. आदिवासी बहुल भागात कुपोषणाचे प्रमाण अजूनही अधिक असल्याचे दिसून येत आहे. महिला व बालकल्याण विभागा मार्फत रायगड जिल्ह्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील १६ प्रकल्पातील ३ हजार १६१ अंगणवाड्यांचे तसेच मिनी अंगणवाड्यातील मुलांचे सर्वेक्षण करण्यात आले. यात एकुण १ लाख ६ हजार १३० बालकांची तपासणी करण्यात आली. यापैकी ९८ हजार ७८० मुलांचे वजन घेण्यात आले. या सर्वेक्षणात तीव्र कुपोषित श्रेणीतील ६१ बालके, सौम्य कुपोषित श्रेणीतील २९३ बालके आढळून आली. कर्जत, रोहा, माणगाव, पोलादपूर, पेण, महाड या तालुक्यात कुपोषित बाल कांचे प्रमाण अधिक आहे. महत्वाची बाब म्हणजे कुपोषणाचे प्रमाण कमी व्हावे महिला बाल कल्याण विभागाने एपीजे अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरू केली आहे. या योजनेनुसार कुपोषित



बालके, स्तनदा माता आणि गरोदर महिलांना आठवड्यातून एक दिवस अतिरिक्त आहार पुरवला जातो आहे. मात्र तरीही रायगड जिल्ह्यातील कुपोषणाच्या प्रमाण घटलेले नाही. आदिवासी समाजात होणारे बालविवाह, बेरोजगारी, आदिवासींचे रोजगारासाठी स्थलांतरण, त्यामुळे मुलांची होणारी अनाळ ही कुपोषणा मागची काही प्रमुख कारणे आहेत.

कुपोषण निर्मितीसाठी गाव पातळी, तालुका पातळीवरील समित्या अस्तित्वात नाही. त्यामुळे कुपोषण निर्मुलनाचे काम प्रभावीपणे होऊ शकत नाही. अंगणवाडीत दिला जाणारा पोषण आहार हा गरम शिजवून दिला पाहीजे. शासनाकडून वाटप करण्यात येणारी पाकीट ही मुल खाऊ शकत नाही. बरेचदा ही पाकीटे टाकून दिली जातात.

# वायू प्रदूषण प्रतिबंधासाठी रस्त्यांवरील माती उचलून हवेत प्रक्रियाकृत पाणी फवारणीची प्रभावी उपाययोजना

नवी मुंबई क्षेत्रातील वायू प्रदूषण प्रतिबंधासाठी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्वच स्तरांवर युध्दपातळीवर काम सुरू असून त्याचा फरकही दिसू लागला आहे. महापालिका क्षेत्रातील बांधकाम साईट्स, दगडखाणी तसेच सिमेंट निर्मिती प्रकल्पांवर लक्ष केंद्रीत करण्याप्रमाणेच रस्त्यांवरील माती व राडारोडा साफसफाई करून लगेच उचलून वाहून नेण्याची तसेच रस्ते प्रक्रियाकृत पाण्याने धुण्याची सखोल स्वच्छता मोहीम दोन्ही सत्रांमध्ये राबविली जात आहे. त्या सोबतीने एनकॅपच्या फॉगर्स वाहनाव्दारे वर्दळीच्या रस्त्यांवर हवेत प्रक्रियाकृत पाणी फवारणी करण्यात येत आहे, ज्यायोगे हवेतील धुलीकण रस्त्यांवर बसतील व साफ करता येतील.



आजही कोपरखैरणे गाव येथील मुख्य रस्ता, घणसोली सेक्टर २३ तसेच घणसोली पामबीच रोडची सखोल स्वच्छता करण्यात आली. तुर्भेगाव परिसरातील मुख्य रस्ते त्याचप्रमाणे घणसोली राबाडागाव मार्केट हनुमान मंदिर व दत्त मंदिरासमोरील रोडची साफसफाई करून माती उचलून नेण्यात आली. दिघा विभागातही रेल्वे स्टेशन परिसर आणि मुकंद चौक परिसर येथे सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नेरूळ सेक्टर ३ परिसरातही उद्याच्या दत्तजयंतीच्या पार्श्वभूमीवर डीप क्लिनींग करण्यात आली. याशिवाय बेलापूर विभागामध्ये पारसिक हिलवर अपोलो हॉस्पिटल मागील रस्त्यावरही सफाई करण्यात आली. रस्ते व जागांची सफाई झाल्यानंतर माती उचलून नेण्यात आली व प्रक्रिया केलेल्या पाण्याने रस्ते धुवून घेण्यात आले.

नियमितपणे केल्या जाणाऱ्या दैनंदिन स्वच्छतेसोबतच हवेतील धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी नवी मुंबईत ठिकठिकाणी सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# मुलुंडमधील ज्येष्ठ दाम्पत्याला डिजिटल अटकची भीती दाखवत ३२.८ लाखांचा गंडा

**मुलुंड:** मुंबई पोलिसांकडून वारंवार सायबर- जागरूकता मोहिमा राबवूनही, विशेषतः डिजिटल अटकेबद्दल इशारे देऊनही, ज्येष्ठ नागरिक अजूनही यास बळी पडत आहेत. मुलुंडमधील एका वृद्ध दाम्पत्य अलिकडेच एका सायबर फसवणुकीला बळी पडले आहे. यामध्ये घोटाळेबाजांनी गुन्हे शाखेचे अधिकारी असल्याचे भासवून ३२.८० लाख रुपये उकळले.

पूर्व विभाग सायबर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ११ नोव्हेंबर रोजी पीडितेला गुन्हे शाखेचे अधिकारी संदीप रॉय म्हणून ओळख सांगणाऱ्या एका व्यक्तीचा फोन आला. २.५ कोटींचा मनी-लाँडरिंगचा व्यवहार तिच्या पतीच्या बँक खात्यातून झाला असून त्यांना आणि तिच्या पतीला लवकरच अटक होण्याची शक्यता आहे, असे रॉय याने सांगितले.

दुसऱ्या दिवशी, त्या महिलेला पोलिसांच्या गणवेशात असलेल्या दोन पुरूषांनी व्हॉट्सअ‍ॅप व्हिडिओ कॉल केला. त्यांनी स्वतःची ओळख गुन्हे शाखेच्या कुलाबा युनिटमधील अधिकारी दीपक रॉय आणि दीपक जयस्वाल अशी सांगितली. 'सहकार्य' केले तर अटक टाळता येईल असे सांगत तिला तिचा बँक बॅलन्स आणि दागिन्यांची माहिती देण्यास सांगितले. यावर विश्वास ठेवून आपल्या युनियन बँकेतील खात्यात ३७ लाख रुपये असल्याचे तिने त्यांना सांगितले. १३ नोव्हेंबरपर्यंत फसवणूक करणाऱ्यांनी तिला एका विशिष्ट बँक खात्यात ३२.८० लाख रुपये ट्रान्सफर करण्यास सांगितले. हे जोडपे मुलुंड (पश्चिम) शाखेत गेले आणि आरटीजीएस ट्रान्सफर पूर्ण केले. नंतर या भामट्यांना पावती दिली. सदर प्रकरण आता अंमलबजावणी संचालनालयाकडे गेले असल्याची थापही त्यांनी मारली.दुसऱ्या दिवशी घोटाळेबाजांनी फसवणूक पुढे नेण्याचा प्रयत्न केला आणि व्हॉट्सघ्पद्वारे पुन्हा तिच्याशी संपर्क साधला आणि तिला तिच्या बँक लॉकरमधून सोन्याचे दागिने काढून मुथूट फायनान्समध्ये गहाण ठेवण्याचे निर्देश दिले. मुथूटचा एक व्यवस्थापक तिच्यासोबत पडताळणीसाठी बँकेत गेला. सुदैवाने त्या संध्याकाळी तिचा जावई आला, त्याने घटनाक्रम ऐकला आणि लगेच लक्षात आले की या जोडप्याची फसवणूक झाली आहे.

# भरधाव कंटेनरने चिरडलं, फरफटत नेलं; भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा दुर्दैवी अंत, कुटुंबाचा आधार गेला

**रायगड :** उरण - नवघर - खोपटा रस्त्यावरील बामण लँडी यार्डजवळ सोमवारी (८ डिसेंबर) दुपारी झालेल्या भीषण अपघातात भेंडखळ गावातील अमोल काळूराम ठाकूर (वय ३८) यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर परिसरात तणाव निर्माण झाला असून संतप्त नागरिकांनी काहीकाळ रास्ता रोको करत प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला. उरण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत अमोल ठाकूर हे मोटारसायकलवरून खोपटा गावाच्या दिशेने जात होते. नवघर - खोपटा रस्त्यावर भरधाव वेगात येणाऱ्या कंटेनर ट्रेलरने अमोल यांच्या दुचाकीला भीषण धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की, ट्रेलरने अमोल यांना काही अंतरावर ओढत नेले, ज्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. प्रत्यक्ष दर्शीनुसार, कंटेनरचा वेग अत्यंत जास्त होता आणि रस्त्यावर वाहनं नियंत्रणाबाहेर धावत असल्याची स्थानिकांची तक्रार नेहमीचीच आहे. अपघाताची माहिती मिळताच भेंडखळ आणि आसपासच्या गावातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. संतापलेल्या नागरिकांनी ट्रेलर चालकाला रोखून धरत वाहन ताब्यात घेतले. त्यानंतर मोठ्या संख्येने नागरिक रस्त्यावर उतरले आणि वाहतूक रोखत प्रशासनाने त्वरीत उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली. रस्त्यावरील वाढत्या अपघातांमुळे स्थानिकांमध्ये नाराजीचे वातावरण पूर्वीपासूनच आहे. घटनेची माहिती मिळताच उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी नागरिकांशी चर्चा करून शांतता राखण्याचे आवाहन केले आणि योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. पोलिसांनी कंटेनर ताब्यात घेतला असून चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मृत अमोल ठाकूर हे कुटुंबातील कर्ते पुरुष होते. त्यांच्या मागे पत्नी आणि दोन लहान मुले असा परिवार आहे. अचानक झालेले हे निधन गावासाठी मोठा धक्का ठरले आहे. या अपघाताचा पुढील तपास उरण पोलिसांनी सुरू केला आहे. प्रशासनाने संबंधित रस्त्यावर वाहतूक नियंत्रणासाठी तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

Printed by AIS Printing Solution Published by RAJENDRA KARBHARI BODAKE on behalf of RAJENDRA KARBHARI BODAKE, printed at Thane and published at NIKITA APT,PLOT NO-7/A,SHOP NO-03, SECTOR-5, KOPAR KHAIRANE, NAVI MUMBAI editor RAJENDRA KARBHARI BODAKE Email : savadhanmaharashtra@gmail.com